मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# गणेशोत्सवात आवाजाची मर्यादा पाळा!

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या गणेश मंडळांना सूचना

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी ।** गणेश मंडळांनी ध्वनिवर्धक यंत्रणा लावताना विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक किंवा इतरांचा विचार करावा. आवाजाने कोणालाही त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी. ध्वनिप्रदूषण करु नये. गणेशोत्सवामध्ये आवाजाची मर्यादा पाळावी, अशा सूचना पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गणेश मंडळांना केल्या. मंडळांना परवानगीसाठी 'एक खिडकी योजना' सुरु केली असून यंदापासून गणेश मंडळांना 'मोरया पुरस्कार' देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने आणि शहरातील विविध गणेशोत्सव मंडळे तसेच पोलीस प्रशासन, वीज वितरण तसेच महापालिका अधिकारी यांची संयुक्त बैठक आकुर्डीतील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात झाली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप यावेळी उपस्थित होते. गणेश मंडळांना लागणारा परवाना विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये एक खिडकी योजनेच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. ही सुविधा सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. गणेश मंडळांना परवानगी देताना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, पोलीस प्रशासन, महापालिका तसेच इतर यंत्रणांनी निश्चित केलेल्या अटी शर्तीचे पालन करणे संबंधित मंडळांना बंधनकारक असणार आहे. शहरातील सर्व गणेश मंडळांनी स्वयंसेवकांची नेमणूक करून त्यांची यादी पोलीस प्रशासनास जमा करावी. पोलीस प्रशासनाकडून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ओळखपत्र देण्यात येईल. या स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजनही करण्यात येईल, असेही चौबे यांनी सांगितले.




### घरगुती दराने वीज पुरवठा

» गणेश मंडळांना वापरण्यासाठी विजेची सोय करण्यात येणार आहे. घरगुती दरानेच त्यांना वीज पुरविण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी सांगितले.

> “गणेश मंडळांना महापालिका सर्व सहकार्य करत आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. झाडांवर खिळे ठोकणे, पोस्टर लावणे, फांद्या तोडू नये. – प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पिंपरी-चिंचवडकरांना कचऱ्यावरील कराचा भार!

## वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध

**पिंपरी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेने पूर्वलक्ष्यी प्रभावाने सुरू केलेल्या कचरा सेवा शुल्क वसुलीच्या स्थगितीची राज्य शासनाची घोषणा हवेतच आहे. सव्वा महिन्यानंतरही स्थगितीचा आदेश महापालिकेला प्राप्त झाला नाही. त्यामुळे सेवा शुल्काची वसुली सुरूच आहे. आतापर्यंत तीन लाख ४१ हजार ८७० मालमत्ताधारकांनी ४३ कोटी १४ लाखांच्या शुल्काचा भरणा केला आहे. या वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध आहे. राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी कचरा सेवा शुल्क (उपयोगकर्ता) निर्धारित केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ठरावानुसार शुल्क वसूल करण्यास मान्यता दिली आहे. दि. १ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला. शहरात सहा लाख दोन हजार मालमत्ता आहेत. घरटी दरमहा ६० रुपये व व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना आकारमानानुसार शुल्क आकारण्यात येत आहे. पूर्वलक्ष्यी प्रभावाने २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांचे शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानुसार शुल्क वसुलीस सुरुवात केली. मात्र, चार वर्षांचे शुल्क आकारण्यास शहरातील गृहनिर्माण सोसायटीधारकांनी तीव्र विरोध केला. पावसाळी अधिवेशनात भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधी दाखल केली होती. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची सविस्तर बैठक घेण्यात येईल. नियम व अटींची पडताळणी करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत शुल्कवसुलीला स्थगिती देण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. मात्र, शुल्कवसुली स्थगितीचा आदेश महापालिकेला मिळाला नाही. परिणामी, शुल्काची वसुली सुरूच असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



### कचरा शुल्क भरणाऱ्यांची संख्या

- » औद्योगिक – २५५२
- » निवासी- ३०,४३००
- » बिगर निवासी- २७,२७६
- » मिश्र – ७७३१
- » एकूण- ३,४१,८७०

# चिंचवड मतदार संघातील वीज समस्या सुटणार!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिंचवड विधानसभा मतदार संघात भेडसावणारी वीज समस्या कायमस्वरुपी सोडवण्यासाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली आहे. याबाबत महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत आहे. शहराच्या उपनगर भागात मोठ्या प्रमाणात नवीन व मोठे-मोठे





गृहप्रकल्प, औद्योगिक वसाहती, आयटी कंपन्या उभ्या राहत आहेत. यामुळे या भागात विजेची मागणी मोठ्याप्रमाणात वाढली आहे. सध्यस्थितीला वाकड, ताथवडे, पुनावळे या भागांमध्ये नवीन गृहप्रकल्प विकसित होत आहेत. यामुळे घरगुती जोडणी, व्यवसायिक जोडणी अशा अनेक नवीन ग्राहकांची संख्या वाढली आहे. मात्र, केवळ बिजलीनगर व रहाटणी या दोन ठिकाणी जीव उपकेंद्र आहेत. या दोन उपकेंद्रांवर संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदार संघाचा वीजपुरवठा अवलंबून आहे. परिणामी,

> **वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी याचा विचार करुन महावितरण प्रशासनाने तात्काळ स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारावे, अशी आग्रही मागणीही शंकर जगताप यांनी केली आहे. चिंचवड विधानसभा मतदार संघातील वीज ग्राहकांची संख्या वाढलेली आहे. नवीन गृहप्रकल्प, व्यावसायिक वीज ग्राहक मोठ्या संख्येने असल्यामुळे वीज समस्या आणि तक्रारींमध्ये कमालीची वाढ झाली आहे. वाढत्या मागणीनुसार, वीज पुरवठा यंत्रणा पायाभूत सुविधा विकसित करणे अनिवार्य आहे. त्यामुळे नवीन वीज उपकेंद्र उभारल्यास वीज पुरवठा सुनियोजित होईल. याबाबत महावितरण प्रशासनाला आग्रही मागणी केली आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.**
>
> **– शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

वीज पुरवठा यंत्रणेवर मोठा ताण येत असून, वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरातमध्ये दहीहंडी उत्सवावर विरजण?

## यंदा दहीहंडीच्या आयोजनात मोठी घट

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिका निवडणूक अनिश्चिततेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये दहीहंडीच्या उत्सवावर विरजण पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दर वर्षी औद्योगिकनगरीत मोठ्या जल्लोषात, उत्साहात साजरा होणाऱ्या दहीहंडी उत्सवाबाबत यंदा मात्र निरुत्साह दिसत आहे. निवडणुकीची शक्यता धूसर असल्याने अनेक माजी नगरसेवकांनी खर्चासाठी हात आखडता घेतल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांपासून सार्वजनिक स्वरूपात दहीहंडी साजरी करण्याचे प्रमाण वाढले आहे.
मंडळांसह काही राजकीय नेते आपल्या परिसरात मोठ्या उत्साहात दहीहंडी साजरी करतात.
शहरातील दापोडी, निगडी,



> **महापालिका निवडणूक कधी होईल हे सांगता येत नाही. दोन वर्षांपासून खर्चच सुरू आहे. त्यामुळे यंदा अनेकांनी खर्चात हात आखडता घेतला. सार्वजनिकरीत्या दहीहंडी उत्सव साजरा करण्याकडे पाठ फिरविली आहे.**
>
> **-अमित गावडे, माजी नगरसेवक, निगडी प्राधिकरण**

प्राधिकरण, इंद्रायणीनगर, भोसरी या मानाच्या चौकांमध्ये मोठ्या दहीहंडी फुटतात. गतवर्षी महापालिका निवडणूक होण्याची शक्यता होती. त्यामुळे दहीहंडीच्या माध्यमातून निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून विविध राजकीय पक्षांच्या इच्छुकांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले होते. दहीहंडी उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी शहरभर फलकबाजी केली होती. सिनेतारकांची उपस्थिती, दहीहंडी पथकांवर देण्यात येणारी लाखो रुपयांची बक्षिसे, रोषणाईवर लाखोंचा खर्च करण्यात आला होता. मात्र महापालिका निवडणूक झाली नाही. निवडणूक कधी होईल याबाबत ठोसपणे काही सांगता येत नाही. तूर्तास निवडणूक होण्याची शक्यता धूसर दिसत आहे. त्यामुळे यंदा दहीहंडीच्या आयोजनात मोठी घट झाल्याचे दिसून येते.
काही ठरावीक भागातच दहीहंडी उत्सवाची तयारी सुरू असल्याचे दिसून येत आहे. दोन वर्षांपासून खर्चच सुरू असल्याने माजी नगरसेवकांसह इच्छुकांनी थाटलेली जनसंपर्क कार्यालयेदेखील बंद केली आहेत. यंदा पिंपरी, चिंचवड, मोशी भागातच दहीहंडीची तयारी सुरू आहे. गोविंदा पथकांचा उत्साह, बघ्यांची गर्दी, दहीहंडी फोडण्याची पथकांमधील वाढणारी चुरस, गाण्यांच्या स्वरात थिरकणारे सिनेतारका, तरुण असे वातावरण या वर्षी काही प्रमाणात कमी दिसणार आहे.

# २२ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** इमारतीच्या २२ मजल्यावरून उडी मारून तरुणाने आत्महत्या केली. ही घटना डांगे चौक वाकड रस्त्यावरील केटीसी मॉलच्या मागे असलेल्या हायलाईट सोसायटीत बुधवारी (ता. ६) सकाळी अकराच्या सुमारास घडली. विजय हंडीबाग (वय २४, रा. चिखली) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. विजय यांच्या मित्राचे दाजी व बहीण ह्या सोसायटीत १९ व्या मजल्यावरील सदनिकेत राहतात. विजयला मुंबई जायचे होते त्यासाठी ते दाजींची मोटार घेण्यासाठी भाच्याला घेऊन येथे आले होते. चहापाणी सुरू असताना त्यांना कोणाचा तरी फोन आला. ते बोलत-बोलत इमारतीच्या २२ व्या मजल्यावरील टेरेसवर गेले. त्यांनी उडी मारली. ते खालच्या तिसऱ्या मजल्यावरील पार्किंगच्या पोडीयमवर जोरात आदळले त्याचा प्रचंड मोठा आवाज सोसायटीत झाल्याने. रहिवाशांची एकच गर्दी उसळली. पोलिसांनी प्रथम दर्शनी ही आत्महत्या असल्याचा अंदाज व्यक्त केला असून आत्महत्ये मागील कारण समजू शकले नाही. सध्या पोलिसांनी आकस्मात मृत्युची नोंद केली आहे. पुढील तपास वाकड पोलीस करत आहेत.

# म्हाडातर्फे ५ हजार ८६३ सदनिकांसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात!

## २६ सप्टेंबर अर्ज नोंदणींची अंतिम तारीख

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर व सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ५ हजार ८६३ सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला असून २६ सप्टेंबरपर्यंत अर्ज नोंदणी करता येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते म्हाडाच्या आयोजित कार्यक्रमात हा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जयस्वाल यांनी सांगितले की नूतन एकात्मिक गृहनिर्माण लॉटरी व्यवस्थापन संगणकीय प्रणालीद्वारे पुणे मंडळ सदनिका विक्री करिता सोडतीची प्रक्रिया राबवली जात असून सोडत काढल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्काळ ऑनलाईन प्रथम सूचना पत्र, स्वीकृती पत्र व तात्पुरते देकार पत्र पाठवण्याची कार्यवाही केली जाणार आहे. म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील म्हणाले, म्हाडाने विविध उत्पन्न गटातील नागरिकांसाठी पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर व सांगली शहरातील ५ हजार ८६३ सदनिकांची सोडत जाहीर केली आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत २६ सप्टेंबर असून घरांची सोडत १८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला तसेच ज्या आरक्षण




असणाऱ्या वर्गातून अर्ज करत आहे त्याचे प्रमाणपत्र असे पुरावे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अर्जाची छाननी देखील ऑनलाईन होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याचा पर्याय मंडळातर्फे नागरिकांकरीता खुला राहणार आहे. नोंदणी केलेल्या अर्जदारांना २७ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. ऑनलाईन अनामत रक्कमेची स्वीकृती २८ सप्टेंबरपर्यंत केली जाणार आहे. २९ सप्टेंबर रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत आरटीजीएस, एनइएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जांची प्रारूप यादी ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादीवरील अर्जदारांना ऑनलाईन दावे, हरकती १२ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करता येणार आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची अंतिम यादी १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता म्हाडाच्या हींींः// हेींोळपस.ाहरवर.सेीं.ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. सोडतीत पुणे जिल्ह्यासाठी ५ हजार ४२५ सदनिका, सोलापूर जिल्ह्यासाठी ६९ सदनिका, सांगली जिल्ह्यासाठी ३२ सदनिका व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

### या तारखेपर्यंत अनामत रक्कम भरता येईल

**» ऑनलाईन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याचा पर्याय मंडळातर्फे नागरिकांकरीता खुला राहणार आहे. नोंदणी केलेल्या अर्जदारांना २७ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. ऑनलाईन अनामत रक्कमेची स्वीकृती २८ सप्टेंबरपर्यंत केली जाणार आहे. २९ सप्टेंबर रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत आरटीजीएस, एनइएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे.**

# विद्यापीठामध्ये 'नॉलेज शेअरींग'चा सामंजस्य करार!

## कुलगुरू डॉ. सुधीर आगाशे अन् मुख्य अभियंता राजेंद्र पवारांची उपस्थिती

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

अभियांत्रिकी शिक्षणाला व्यावहारिक ज्ञानाची व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीची जोड देण्यासाठी महावितरण व सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठामध्ये 'नॉलेज शेअरींग'चा नुकताच सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरू डॉ. सुधीर आगाशे आणि मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. वीजक्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व घडामोडी, ज्ञानाचे आदान प्रदान, वीजसुरक्षा व महावितरणच्या विविध डिजिटल ग्राहकसेवा आदींबाबत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून 'नॉलेज शेअरींग' करण्यात येणार आहे. याआधी गेल्या ऑगस्टमध्ये महावितरण व जिल्ह्यातील ३२ अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार झाला होता. त्यानंतर आता सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठासोबत सामंजस्य करार झाला आहे. एका छोटेखानी कार्यक्रमात कुलगुरू डॉ. सुधीर आगाशे व मुख्य अभियंता राजेंद्र पवार



यांच्यामध्ये वीजक्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, संकल्पना व विविध प्रकल्पांबाबत चर्चा झाली. यावेळी रजिस्ट्रार डॉ. दयाराम सोनवणे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटनी यांची उपस्थिती होती. महापारेषण कंपनीचे रास्तापेठ जीआयएस १३२ केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्र अत्यावश्यक पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीसाठी शनिवारी (दि.९) रात्री १ वाजेपासून ते सोमवारी (दि.११) रात्री १२ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. मात्र या कालावधीत पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याने वीजपुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

### रास्तापेठ उपकेंद्र दुरुस्तीसाठी बंद

**» महापारेषणच्या या अतिउच्चदाब उपकेंद्रातून महावितरणच्या २२ केव्हीच्या ११ आणि ११ केव्हीच्या १० अशा एकूण २१ वीजवाहिन्यांद्वारे रास्तापेठ, पर्वती व पद्मावती विभागातील भागात वीजपुरवठा केला जातो. सणासुदीचे दिवस व पावसाळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर या उपकेंद्रातील काही यंत्रणेची दुरुस्ती सुरळीत वीजपुरवठ्यासाठी अतिशय आवश्यक झाली आहे. त्यामुळे दि. ९ ते दि. ११ पर्यंत यंत्रणेच्या दुरुस्तीचे काम होणार आहे. या कालावधीत महावितरण व महापारेषणकडून ९७ मेगावॅट विजेचे भारव्यवस्थापन करून पर्यायी स्वरुपात सर्व २१ वाहिन्यांना वीजपुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी २२० केव्हीच्या पर्वती, फुरसुंगी व खडकी तसेच १३२ केव्हीच्या फुरसुंगी व मुंढवा अतिउच्चदाब उपकेंद्रातून पर्यायी स्वरुपात वीजपुरवठा होणार आहे.**

# राज्यातील शाळांमध्ये परसबाग निर्मितीला प्रोत्साहनासाठी स्पर्धा!

## गेल्यावर्षीच्या स्पर्धेतून २२ हजार ९७३ परसबागांची निर्मिती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्र सरकारने साखरेच्या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर होणार असून, गेल्यावर्षीच्या स्पर्धेतून सुमारे २२ हजार ९७३ परसबागांची निर्मिती झाली आहे. राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ दिला जातो. केंद्र सरकारच्या २०१९मधील निर्देशानुसार विद्यार्थ्यांनी परसबागेत पिकवलेला भाजीपाला, फळे यांचा समावेश शालेय पोषण आहारात केला जातो. परसबाग



निर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण होवून त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळणे, ताज्या भाजीपाल्याचा समावेश पोषण आहारात होवून विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध होण्याचे हेतू या उपक्रमातून साध्य होतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी स्पर्धा आयोजित करून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन शाळांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यासाठी तालुकास्तरावर एकूण १३ हजार रुपये, जिल्हा स्तरावर २८ हजार रुपये, राज्यस्तरावर १ लाख ३६ हजार रुपये पारितोषिकांसाठी दिले जाणार आहेत. परसबाग उपक्रमासाठी शाळांना नजीकचे कृषि विज्ञान केंद्र, कृषि शाळा, कृषि विभागातील कृषि सहायक, पर्यवेक्षक, कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थाम, सेंद्रीय शेती करणारे पालक, शेतकरी, कृषि तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य घेता येणार आहे. स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षण, आहारतज्ज्ञ, कृषी, आरोग्य, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील अधिकारी, स्थानिक प्रगतीशील शेतकरी यांची समिती नियुक्ती करायची आहे.

### राज्यस्तरावर १ लाख ३६ हजार

**» शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी स्पर्धा आयोजित करून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन शाळांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यासाठी तालुकास्तरावर एकूण १३ हजार रुपये, जिल्हा स्तरावर २८ हजार रुपये, राज्यस्तरावर १ लाख ३६ हजार रुपये पारितोषिकांसाठी दिले जाणार आहेत.**

# दहीहंडी निम्मित वाहतुकीत बदल!

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचा वाहतूक विभागाचे आवाहन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे शहरातील विविध भागात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात स्जकर करण्यात येत आहे. अनेक मंडळांनी तर याची तयारी मागच्या आठवड्या पासून सुरु केली आहे. यानिमित्ताने विशेषतः शहरातील मध्यभागातील शिवाजीरोड, लक्ष्मीरोड, बाजीराव रोड, टिळक रोड सायंकाळी ५ ते दहीहंडी फुटे पर्यंत बुधवार चौक ते दत्तमंदिर चौक तसेच बेलबाग चौक ते सेवासदन चौक, बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक, मंडई चौक ते (बाबू गेनू चौक), साहित्य परिषद चौक नवी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी असते. याठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे.



» शिवाजीरोड वरुन स्वारगेटला जाण्यासाठी : स. गो. बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने खंडोजी बाबा चौक, टिळक चौक-पुढे टिळक रोडने, शास्त्री रोडने इच्छित स्थळी जावे.

» पुरम चौकातुन बाजीराव रोडवरून शिवाजीनगर कडे जाण्यासाठी पुरम चौकातुन टिळक रोडने - अलका टॉकीज चौक व पुढे एफ.सी.रोडने इच्छित स्थळी जावे. तसेच पुरम चौकातुन सेनादत्त चौकाकडे व पुढे इच्छित स्थळी जाता येईल.

» स. गो. बर्वे चौकातुन पुणे मनपा भवनकडे जाण्यासाठी : स. गो. बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने - झाशी राणी चौक डावीकडे वळुन इच्छितस्थळी जावे.

» बुधवार चौकाकडुन आप्पा बळवंत चौकाकडे एकेरी वाहतुक असणार आहे. फब्रळवंत चौकातुन बुधवार चौकाकडे येणारी वाहतुक बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जाता येईल .

» रामेश्वर चौक ते शनिपार चौकाकडे येणारी वाहतुक बंद करण्यात आली आहे. पर्यायी मार्गाचा वापर करावा.

» सोन्या मारुती चौकाकडुन लक्ष्मी रोडने सरळ सेवासदन चौकाकडे वाहतुकीकरिता बंद करण्यात आला आहे. वाहने सोन्या मारुती चौकातुन उजवीकडे वळुन फडके हौद चौकातुन इच्छित स्थळी जात येईल.

» शिवाजी रोडवरुन जिजामाता चौकातून गणेश रोडने दारुवाला पुलकडे जाणारी वाहतूक हि गाडगीळ पुतळा येथून डाव्या बाजूने कुंभारवेस चौक- पवळे चौक- जुनी साततोटी पोलीस चौकी मार्गे इच्छितस्थळी जात येईल.

» गणेश रोडवरील संपूर्ण वाहतूक हि दारुवाला पुल येथून बंद राहिल. तसेच देवजीबाबा चौक व फडके हौद चौकात वाहतूक बंद करण्यात येईल. वाहनचालकांनी अपोलो टॉकिज, नरपतगिरी चौक, दारुवाला पूल. दुधभट्टी या मार्गाचा वापर करावे असे आवाहन वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे.

# विनयभंग प्रकरणी पशुसंवर्धन अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे जिल्हा परिषद येथील पशुसंवर्धन विभागाचे तत्कालीन अधिकारी डॉ. शिवाजी विधाते यांच्यावर कर्णबधिर मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे निर्देश शिवाजीनगर न्यायलयाने दिले आहे. पुणे जिल्हा परिषद येथील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी डॉ. शिवाजी विधाते यांच्या विरुद्ध कर्णबधिर मुलीची फसवणूक आणि विनयभंग केल्या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या ३५४, ४२०, ५०४, ५०६ आणि ५०९ यासह अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती याचिकाकर्तेचे वकील तोसिफ शेख आणि ॲड. क्रांतीलाल सहाणे यांनी दिली आहे. ही घटना पीडित मुलगी जिल्हा परिषदेमध्ये काम करत असताना घडली आहे.डॉ. विधाते हे सतत पीडितेला त्यांच्या कार्यालयात कामासंबंधी चर्चा करण्यासाठी बोलवत असे. ते सतत पीडितेकडे एका वेगळ्या नजरेने पाहत असे. परंतु ते अधिकारी असल्यामुळे पीडितेला त्यांना बोलण्याची हिंमत होत नव्हती. असेच एके दिवशी त्यांनी पीडितेला अचानक त्यांच्या कार्यालयात बोलावले आणि पीडितेला तुझा हात दाखव असे म्हणाले पीडितिने लांबूनच डॉ. विधाते यांना हात दाखवला असता, त्यांनी बळजबरीने तिच्या इच्छे विरोधात हात ओढून स्वतः कडे ओढले आणि हात खूप जोरात दाबून तिच्या मोबाईलची मागणी केली.

असा गैरवर्तनाचा त्रास वारंवार पीडितेला सदरील आरोपीकडून होत होता. पीडित मुलगी ही त्या ठिकाणी कंत्राटी पद्धतीवर कामाला होती. तुला कायमस्वरूपी वेतनश्रेणीवर कामावर घेतो म्हणून सतत पैशाची मागणी करत असे. कंत्राटी पद्धतीत कामावर येणारा पगार पैकी ५०% रक्कम द्यावी लागेल अशी मागणी केली.